# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.05.2025** **वारःगुरुवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज 103 पुनर्विकसित अमृत भार रेल्वे स्थानकांचं उद्घाटन होणार
2. ऑपरेशन सिंदूरच्या राजनैतिक मोहमेअंतर्गत दोन सर्वपक्षीय शिष्टमंडळं विदेश दौऱ्यावर रवाना
3. इस्राइलच्या हल्ल्यात गाझा भागात 82 नागरिकांचा मृत्यू
4. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाचं बाद फेरीतलं स्थान निश्चित आणि
5. महाराष्ट्रासह गोवा आणि गुजरातमध्ये पुढच्या 2-3 दिवसांत मुसळधार ते अती मुसळधार पावसाचा इशारा

**<u>अमृत स्थानक पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजस्थानमधील बिकानेर इथं अनेक विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण होणार आहे. रेल्वे, रस्ते, उर्जा, पाणी आणि नवीन तसंच नवीकरणीय उर्जा क्षेत्रातले हे प्रकल्प आहेत. याच कार्यक्रमात पंतप्रधान 103 पुनर्विकसित अमृत भारत स्थानकांचंही उद्घाटन करणार आहेत. 18 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या 86 जिल्ह्यांतल्या रेल्वे स्थानकांचा यात समावेश आहे. स्थानिक कला, संस्कृती, परंपरांचं दर्शन घडवण्याच्या दृष्टीने या रेल्वेस्थानकांचं सुशोभीकरण करण्यात आलं आहे. तसंच या स्थानकांवर दिव्यांग व्यक्तींसाठी खास सुविधा उभारण्यात आल्या आहेत. यामध्ये तेलंगणमधल्या बेगमपेठ या संपूर्णपणे महिलांद्वारे संचलित रेल्वे स्थानकाचाही समावेश आहे. बेगमपेठ हे सगळ्या महिला कर्मचारी अधिकारी असलेलं देशातलं पहिलं रेल्वे स्थानक आहे. एकंदर 13 शे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार असून 2027 पर्यंत सुमारे 500 स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण करण्याचं उद्दीष्ट आहे अशी माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल माध्यमांना दिली.

**<u>उपराष्ट्रपती</u>**

सध्याच्या भूराजकीय परिस्थितीत समुद्रातील नियमानुसार आदेशांची अंमलबजावणी होणं महत्त्वाचं आहे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. मडगांव इथं विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन काल उपराष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. भारताच्या अर्थव्यवस्था वाढीच्या दृष्टीनं जहाजबांधणी क्षेत्रात आपण आघाडी घेतली पाहिजे असं धनखड म्हणाले. ऑपरेशन सिंदूरमुळे भारत दहशतवादाला कधीच माफ करणार नाही असा संदेश जगाला दिला गेला असं सांगत त्यांनी भारतीय तटरक्षक दलाच्या कार्याची प्रशंसा केली.

**<u>सर्वपक्षीय शिष्टमंडळ</u>**

पाकिस्तान दहशतवादाला पाठबळ देत असल्याचं जगासमोर उघड करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतानं धडक मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत काल दोन सर्वपक्षीय शिष्टमंडळं नऊ देशांच्या दौऱ्यावर रवाना झाली. संयुक्त जनता दलाचे खासदार संजयकुमार झा यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, साउथ कोरिया, जपान आणि सिंगापूर

या देशांना भेट देणार आहे तर शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळ संयुक्त अरब अमीराती, लायबेरिया, काँगो आणि सिएरा लिओन देशाला भेट देईल.

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरबाबत देशभरातील नागरिक आकाशवाणीच्या माध्यमातून अभिमान व्यक्त करत आहेत. महाराष्ट्रातल्या रायगड जिल्ह्यात अलिबाग इथल्या विधीज्ञ पल्लवी भिसे यांनी आपल्या भावना या शब्दांत व्यक्त केल्या आहेत...

**पहलगामच्या हल्ल्यानंतर ह्या सरकारने कठोर भूमिका घेतलेली आहे, आणि आपल्या सैन्यांनी ही भूमिका अतिशय चांगल्या पद्धतीने पुढे नेली आहे. कुरेशी मॅडम आणि व्योमिका मॅडम यांनी केलेल्या कामगिरीबद्दल मला प्रचंड अभिमान आहे. ज्यावेळेला पहिल्यांदाही या दोन स्त्रियांना बघितलं त्यावेळेला मला अभिमानाने मान उंचावतय हे म्हणायला हरकत नाही कारण इतकी मी भारावून गेले होते, की आज आपल्या सैन्याचं प्रतिनिधित्व दोन बायका करताय म्हणजे नक्कीच आपला देश हा पुढे प्रगतीपथावर जातोय याची मला खात्री आहे.**

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल कोपनहेगन इथं डेन्मार्कचे उद्योग मंत्री मॉर्टेन बोडस्कोव यांची भेट घेतली. दोन्ही देशांमधलं सध्याचं सहकार्य आणखी वाढवून नव्या क्षेत्रांमधल्या सहकार्याच्या शक्यता पडताळून पाहण्याबाबत यावेळी चर्चा झाली. जयशंकर यांनी डेन्मार्कचे सभापती सोरेन गेड यांचीही भेट घेतली. भारताच्या दहशतवाद विरोधाच्या निर्धाराला पाठिंबा दर्शवल्याबद्दल जयशंकर यांनी गेड यांचे समाज माध्यमावरील संदेशाद्वारे आभार मानले आहेत.

**रशिया राजदूत**

रशियात मॉस्को इथं झालेल्या धोरणात्मक संवाद याविषयीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारतातर्फे रशियातील भारताचे राजदूत विनय कुमार सहभागी झाले होते. मानवी सभ्यतेतली संवादाची भूमिका आणि महत्त्व सांगून आधुनिक तंत्रज्ञानामुळे संवादाच्या पद्धतीत झालेल्या बदलांचा त्यांनी आढावा घेतला. भारतातल्या संवाद क्षेत्रातल्या उद्योगांच्या उल्लेखनीय यशाचीही त्यांनी यावेळी माहिती दिली.

**दहशतवाद विरोधी शपथ**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त काल देशभरात विविध कार्यक्रमांद्वारे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. हा स्मृतीदिन दहशतवाद आणि हिंसाचार विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी दहशतवादविरोधी दिनानिमित्त राजभवनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दहशतवादाला विरोध करण्याबाबतची तसंच शांतता आणि सामाजिक सलोखा कायम राखण्याबाबतची शपथ दिली.

**गाझा हल्ले**

आंतरराष्ट्रीय स्तरावरुन वारंवार टीका होत असून देखील इस्राइलच्या लष्करानं गाझा पट्टीत हल्ले करणं अद्याप सुरूच ठेवलं आहे. गाझाच्या आरोग्य मंत्रालयानं आणि स्थानिक रुग्णालयांनी दिलेल्या आकडेवारीनुसार अनेक महिलांसह किमान 82 लोकांचा यात मृत्यू झाला आहे. या हल्ल्यात हिजबुल संघटनेच्या प्रमुख रदवान दलाचा कमांडर ठार झाल्याचा दावा इस्राइलनं केला आहे. दरम्यान, गाझा भागात मदत पुरवण्याबाबत आपला इस्राइलसोबत करार झाल्याची माहिती

संयुक्त अरब अमीरातींनी दिली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात गाझामधल्या सुमारे 15 हजार नागरिकांना अन्नपुरवठा केला जाणार आहे. संयुक्त राष्ट्रांनी मात्र इस्त्राइलची सुरक्षा व्यवस्था अजूनही मदत कार्यात अडथळे आणून गाझामधल्या नागरिकांच्या समस्या वाढवत असल्याचं म्हटलं आहे.

**<u>बांग्लादेश</u>**

म्यानमाच्या राखीने या प्रांताला मानवीय दृष्टीने बांग्लादेशमधून मार्गिका वापरण्याची परवानगी देण्याची शक्यता बांग्लादेशनं फेटाळून लावली आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही प्रस्तावावर सरकारनं चर्चा केली नाही तसंच करण्याची शक्यताही नाही असं बांग्लादेशचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार खलिउर रहमान यांनी काल सांगितलं. अशी मार्गिका उपलब्ध करुन देण्यासाठी बांग्लादेशवर कोणताही परकीय दबाव नाही असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>कैलास</u>**

यावर्षीच्या कैलास मानसरोवर यात्रेसाठी 750 यात्रेकरुंची ऑनलाईन संगणकीय सोडतीद्वारे काल निवड करण्यात आली. पहिली तुकडी 30 जूनला रवाना होईल, 25 ऑगस्टपर्यंत प्रत्येकी 50 यात्रेकरुंच्या 15 पंधरा तुकड्या ही यात्रा पूर्ण करतील. यापैकी पाच तुकड्या लिपुलेखमार्गे तर दहा तुकड्या नथुलामार्गे जातील.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेतलं मुंबई इंडियन्स संघाचं बाद फेरीतलं स्थान निश्चित झालं आहे. काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्स संघानं दिल्ली कॅपिटल्स संघावर 59 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना मुंबईच्या संघानं 20 षटकांत 180 धावा केल्या. त्याच्या उत्तरादाखल दिल्लीचा संघ 121 धावाच करू शकला.
आज अहमदाबाद इथं गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपर जायंटस् यांच्यात सामना होणार आहे.

**<u>हवामान</u>**

यावर्षी मोसमी पावसाचं आगमन लवकर होणार असून केरळमध्ये तो येत्या 2-3 दिवसांत पोहोचेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे. महाराष्ट्र, कोकण, गोवा आणि गुजरातमध्ये पुढच्या 2-3 दिवसांत मुसळधार ते अती मुसळधार पाऊस पडेल असा इशारा देण्यात आला आहे. ईशान्येकडील राज्यांही येत्या रविवारपर्यंत जोरदार पाऊस पडेल. पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि उत्तराखंड राज्यांत तसंच दिल्ली राजधानी क्षेत्रात आज मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.